सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २८७ | गुरुवार, दि. ९ जुलै २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**
**आजचे भाव**

२४ सोने ९९.५०% : ₹ १४१९००
२२ सोने ९१.६०% : ₹ १३०५००
१८ सोने ७५.००% : ₹ १०८०००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २२९०/-
भाव प्रती १० ग्रॅम

### दिनविशेष
९ जुलै

- भारतातील पहिले स्टॉक एक्सचेंज म्हणजेच बॉम्बे स्टॉक एक्सचेंज बीएसई मुंबईतील दलात स्ट्रीट येथे स्थापन करण्यात आले.
- अखिल भारतीय विद्यार्थी परिषद स्थपना.
- वाघाला भारताचा राष्ट्रीय प्राणी घोषित करण्यात आले.
- रशियाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आपल्या सर्वोच्च पुरस्काराने (ऑर्डर ऑफ सेंट एंड्रयू द एपोस्टल) सन्मानित केले आहे.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेव्हा-तेव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**

**अमळनेर हळहळले...**

# सेल्फी काढण्याचा मोह जीवावर बेतला

## खदानीतील पाण्यात बुडून तीन अल्पवयीन मित्रांचा मृत्यू

### दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर धोकादायक जलाशयांपासून दूर राहण्याचे पोलिसांचे आवाहन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरालगतच्या चोपडा रोडवरील उड्डाण पुलाजवळील पाण्याने भरलेल्या खदाणीत सेल्फी काढण्याचा प्रयत्न तीन अल्पवयीन मित्रांच्या जीवावर बेतल्याची हृदयद्रावक घटना मंगळवार, दि. ७ जुलै रोजी सायंकाळी घडली. खदाणीच्या मध्यभागी असलेल्या बेटासारख्या उंचवट्यावर उभे राहून सेल्फी घेताना एका मुलाचा तोल जाऊन तो खोल पाण्यात पडला. त्याला वाचविण्यासाठी धावलेल्या अन्य दोघांनाही पाण्याने ओढल्याने तिघांचाही बुडून मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेने शहरावर शोककळा पसरली असून, संपूर्ण परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे. या प्रकरणी पोलिसांत आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मानव बंटी रतनानी (वय १४), कार्तिक विकी उधवानी (वय १४) आणि दिनेश विजय पंजवानी (वय १७) अशी मृतांची नावे आहेत. तिघेही येथील सिंधी कॉलनीतील रहिवासी होते. मानव आणि कार्तिक हे नववीत शिक्षण घेत होते, तर दिनेश हा प्रताप महाविद्यालयात अकरावी वाणिज्य शाखेत शिकत असून, अर्धवेळ नोकरीही करत होता.

प्राप्त माहितीनुसार मंगळवारी सायंकाळी पावणेपाचच्या सुमारास तिघे मित्र फिरण्यासाठी खदाणीच्या परिसरात गेले होते. यावेळी खदाणीच्या मध्यभागी असलेल्या बेटासारख्या उंचवट्यावर कमी पाणी असल्याने ते पाण्यातून चालत तेथे पोहोचले. यानंतर मोबाईलवर सेल्फी काढत असताना एका मुलाचा अचानक पाण्यात तोल गेला आणि तो सुमारे ३० फूट खोल पाण्यात पडला. मित्राला वाचविण्यासाठी दुसऱ्या मुलाने त्याचा हात पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र, तोही खोल पाण्यात ओढला गेला. दोघांना वाचविण्यासाठी तिसऱ्या मित्रानेही धाव घेतली. परंतु पाण्याची खोली आणि तळाचा अंदाज न आल्याने तिघेही एका पाठोपाठ पाण्यात बुडाले. दरम्यान, ही घटना खदाणीजवळून जात असलेल्या एका रिक्षाचालकाच्या लक्षात आली. त्याने तत्काळ घटनास्थळी धाव घेत ११२ क्रमांकावर संपर्क साधून पोलिसांना माहिती दिली.

माहिती मिळताच पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, नायब तहसीलदार सी. यू. पाटील, शहर तलाठी अशपाक पिंजारी, पोलीस कर्मचारी गणेश पाटील तसेच स्थानिक नागरिक घटनास्थळी दाखल झाले. देवळी येथील दीपक मोरे यांनी जीवाची पर्वा न करता खदाणीत उडी मारून तिन्ही मुलांना बाहेर काढले. मात्र, तोपर्यंत त्यांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी


कार्तिक उधवानी


मानव रतनानी


दिनेश पंजवानी

येथील ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे.

एकाच वेळी तीन अल्पवयीन मुलांचा मृत्यू झाल्याने सिंधी कॉलनीसह संपूर्ण शहरात शोककळा पसरली. ग्रामीण रुग्णालयात मृतांचे नातेवाईक व नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. कुटुंबीयांचा आक्रोश पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले. या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर पावसाळ्यात पाण्याने भरलेल्या खदाणी, तलाव, नाले व इतर धोकादायक जलाशयांपासून दूर राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. पाण्याची खोली आणि तळाचा अंदाज येत नसल्याने अशा ठिकाणी सेल्फी काढणे किंवा विनाकारण जाणे टाळावे, असे आवाहन पोलीस निरीक्षक निकम यांनी नागरिकांना केले आहे.


*अमळनेर : चोपडा रोडवरील उड्डाण पुलाजवळील पाण्याने तुडूंब भरलेली हीच ती खदाण जेथे तीन मित्रांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला.*


*अमळनेर : माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त यंदा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अमळनेर शहराध्यक्ष दुर्गेश (डीपी) पाटील आणि भूषण लोहार यांनी स्वखर्चातून स्व. सौ. पद्मावती नारायणदास मुंदडा माध्यमिक विद्यालयातील होतकरू व गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे मोफत वाटप केले.*

# हार-तुरे, केकचा खर्च टाळून विद्यार्थ्यांना मदतीचा हात

### आमदार अनिलदादा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त यंदा हार-तुरे, केक व इतर उत्सवी खर्च टाळून सामाजिक बांधिलकी जपणारा आदर्श उपक्रम शहरात राबविण्यात आला. संत श्री सखाराम महाराज यांच्या वाडी संस्थानातील मंदिराच्या मुख्य इमारतीला लागलेली भीषण आगीची घटना तसेच विमान अपघातात उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांचे निधन झाल्याच्या पार्श्वभूमीवर आमदार अनिलदादांचा वाढदिवस कोणताही जल्लोष न करता साधेपणाने साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्या निर्णयाला अनुसरून स्व. सौ. पद्मावती नारायणदास मुंदडा माध्यमिक विद्यालयातील होतकरू व गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले.

हा समाजोपयोगी उपक्रम राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अमळनेर शहराध्यक्ष दुर्गेश (डीपी) पाटील आणि भूषण लोहार यांनी स्वखर्चातून राबविला. विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, वह्या, पेन, पेन्सील तसेच इतर आवश्यक शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. वाढदिवसानिमित्त होणारा अनावश्यक खर्च टाळून तो विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी खर्च करण्याचा संकल्प त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून साकारला.

या उपक्रमामुळे अनेक गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत मिळाली. त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि पालकांच्या समाधानाने या उपक्रमाचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले.

यावेळी दर्शन पाटील, भूषण लोहार, जयेश पाटील, विवेक पाटील, मोहित शिंदे तसेच मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. हार-तुरे आणि केकवर होणारा खर्च टाळून गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी केलेली ही मदतच अनिलदादा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्तची खरी मानवंदना ठरली.

**आराध्या खमण हाऊसच्या भव्य उद्घाटन सोहळ्याचे आपणांस निमंत्रण...**
**अमळनेरच्या खवय्यांची आता नवीन चवीशी भेट...**

**भव्य शुभारंभ**

अमळनेर पुण्यपावन नगरीतील ग्राहकांच्या सेवेत..

**आराध्या**
**खमण हाऊस व आमरस भंडार**

आम्ही आमच्या नविन दुकानाचा शुभारंभ करीत आहोत तरी या शुभप्रसंगी आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.




**कार्यक्रमाचे उद्घाटन : आई-वडिलांच्या शुभहस्ते**

**- प्रमुख अतिथी -**

मा.श्रीमती.स्मिता उदयजी वाघ — खासदार, जळगांव जिल्हा
मा.श्री.अनिल भाईदास पाटील — आमदार, विधानसभा मतदार संघ, अमळनेर
मा.श्री.शिरीष हिरालाल चौधरी — माजी आमदार, अमळनेर
मा.सौ.जयश्री अनिल पाटील — नगरसेविका, अमळनेर
मा.डॉ.श्री.बी.एस.पाटील — माजी आमदार, अमळनेर
मा.डॉ.श्री.परिक्षीत बाविस्कर — नगराध्यक्ष, अमळनेर न.पा.
मा.श्री.पांडुरंग नामदेव माळी — माजी उपनगराध्यक्ष, अमळनेर न.पा.
मा.श्री.प्रशांत निकम — उपनगराध्यक्ष, अमळनेर न.पा.

**- विनीत -**
श्री.लोटन श्रावण पाटील, सौ.भारती लोटन पाटील
श्री.हर्षद पाटील, सौ.वेदांगी हर्षद पाटील

**- विशेष सहकार्य -**
मा.डॉ.अमोलदादा पाटील — प्रमुख : श्री स्वामी समर्थ केंद्र,अमळनेर
मा.श्री.रमेश भगवान साळुंखे — सेवानिवृत्त : बँक कर्मचारी

**- वेळ व दिनांक -**
गुरूवार, दि.9 जुलै 2026
सकाळी 10 वाजता

**- कार्यक्रमाचे ठिकाण -**
श्री स्वामी समर्थ केंद्रासमोर, धुळे रोड, अमळनेर
8401579704

अनुष्का (लकी),9422268721

## संपादकीय



# निसर्गाचा इशारा

पाऊस हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा, शेतीचा आणि अर्थकारणाचा अविभाज्य घटक आहे. त्याच्या आगमनाने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आशेची पालवी फुटते, धरणे भरतात, नद्या जीवंत होतात आणि निसर्ग नवचैतन्याने बहरून येतो. मात्र, हाच पाऊस जेव्हा आपली मर्यादा ओलांडतो तेव्हा वरदानाचे संकटात रूपांतर व्हायला वेळ लागत नाही. गेल्या काही दिवसांपासून राज्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाने नेमकी हीच परिस्थिती निर्माण केली आहे. कोकणापासून पश्चिम महाराष्ट्रापर्यंत, मुंबईपासून नाशिकपर्यंत आणि घाटमाथ्यापासून विदर्भापर्यंत निसर्गाने रौद्रावतार धारण केला आहे. नद्या दुथडी भरून वाहत आहेत, रस्ते जलमय झाले आहेत, दरडी कोसळत आहेत, तर रेल्वे आणि रस्ते वाहतुकीची चाके अक्षरशः ठप्प झाली आहेत. राज्यातील अनेक भागांत जनजीवन विस्कळीत झाले असून, विकासाच्या दाव्यांचीही या पावसाने कठोर परीक्षा घेतली आहे. आर्थिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबईत प्रत्येक मोठ्या पावसानंतर निर्माण होणारे हे चित्र आता नवीन राहिलेले नाही. पावसाच्या प्रत्येक सरीसोबत शहराच्या नियोजनातील त्रुटीही उघड होतात, जलनिःस्सारण व्यवस्था, वाढते काँक्रीटीकरण, नैसर्गिक नाल्यांवरील अतिक्रमणे आणि वाढती लोकसंख्या या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून मुंबईला दरवर्षी अशा संकटाला सामोरे जावे लागत आहे. मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरील परिस्थितीही तितकीच गंभीर होती. नवीन बोगद्याजवळ दरड कोसळल्याने दोन्ही बाजूंची वाहतूक ठप्प झाली. मोठ्या अपेक्षेने उभारण्यात आलेल्या 'मिसिंग लिंक' प्रकल्पालाही निसर्गाने पहिल्याच मोठ्या कसोटीवर उभे केले.

जुन्या द्रुतगती मार्गावर अमृतांजन पुलाजवळ आणि खालापूर परिसरात पाणी साचल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. पुणे–मुंबई लोहमार्गावरील ठाकूरवाडी परिसरात दरड कोसळल्यामुळे रेल्वे वाहतुकीवरही परिणाम झाला. महामार्ग आणि लोहमार्ग हे दोन्ही प्रमुख दुवे एकाच वेळी विस्कळीत झाल्याने हजारो प्रवासी अडकून पडले. ही घटना केवळ नैसर्गिक आपत्ती नसून, हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर पायाभूत सुविधांच्या टिकाऊपणाचा गंभीर प्रश्नही उपस्थित करते. रायगड जिल्ह्यातील पूरस्थितीनंतर चिंतेच वातावरण निर्माण केले. सावित्री, कुंडलिका, अंबा आणि पाताळगंगा नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडल्याने महाड, रोहा, नागोठाणे, पेण आणि खोपोली परिसर जलमय झाला. अनेक गावांचा संपर्क तुटला, नागरिकांना सुरक्षितस्थळी हलवावे लागले आणि अनेक कुटुंबांचा संसार पाण्याखाली गेला. पूर ओसरल्यानंतरही मागे उरते ते नुकसान, चिखल, रोगराईची भीती आणि नव्याने आयुष्य उभे करण्याचे आव्हान. त्यामुळे आपत्ती व्यवस्थापनाबरोबरच आपत्तीनंतरच्या पुनर्वसनालाही तितकेच महत्त्व द्यावे लागणार आहे. नाशिक जिल्ह्यातही गेल्या काही दिवसांपासून पावसाने जोरदार हजेरी लावली. भारतीय हवामान विभागाने इगतपुरी, त्र्यंबकेश्वर आणि घाटमाथा परिसरासाठी ढगफुटीसदृश अतिवृष्टीचा इशारा दिल्याने प्रशासनाने यंत्रणा सतर्क ठेवली, संभाव्य पूरस्थिती, दरडी कोसळण्याचा धोका आणि नदीकाठच्या गावांबाबत खबरदारीच्या सूचना देण्यात आल्या. सुदैवाने अपेक्षेइतकी भीषण परिस्थिती निर्माण झाली नाही आणि पुढील काही तासांत अतिवृष्टीचा धोका कमी झाल्याने नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला. मात्र, या घटनेने हवामानातील वाढती अनिश्चितता आणि आपत्तीपूर्व तयारीचे महत्त्व पुन्हा अधोरेखित केले. संकट टळले असले, तरी सतर्कता कमी होता कामा नये, हा धडा या अनुभवातून मिळाला आहे. दुसरीकडे पर्यटननगरी लोणावळ्यात पावसाने विक्रमी हजरी लावत निसर्गसौंदर्य खुलवले. धबधबे फेसाळले, डोंगर हिरवाईने नटले आणि पर्यटकांनी मोठी गर्दी केली. पर्यटन व्यवसायाला याचा लाभ झाला असला, तरी अतिवृष्टीच्या काळात सुरक्षिततेचे नियम पाळणे तितकेच आवश्यक आहे.

निसर्गाचा आनंद घेताना त्याच्या रौद्र रूपाचाही विसर पडता कामा नये. दरवर्षी अशा काळात निष्काळजीपणामुळे होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासन आणि पर्यटक दोघांनीही अधिक जबाबदारीने वागण्याची गरज आहे. नाशिकसह राज्यातील अनेक भागांत सलग पावसामुळे शतीच्या कामांना वेग आला आहे. शेतकरी पेरणीला लागला असला, तरी अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान होण्याची भीती कायम आहे. शेतीला पाऊस आवश्यक आहे; मात्र त्याचा अतिरेक शेतीसाठीही तितकाच घातक ठरतो. हवामानातील बदलामुळे पावसाचा स्वभावही बदलला आहे. पूर्वी अनेक दिवसांत पडणारा पाऊस आता काही तासांत कोसळतो. त्यामुळे नद्या, धरणे, नाले आणि शहरांची जलनिःस्सारण व्यवस्था क्षणात अपुरी पडते. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन भविष्यातील नियोजन करणे अत्यावश्यक झाले आहे. आजची गरज केवळ नुकसानभरपाई जाहीर करण्याची नाही, तर शहर आणि गावांच्या विकास आराखड्यांचा नव्याने विचार करण्याची आहे. नदीपात्रांवरील अतिक्रमण हटविणे, नैसर्गिक जलमार्ग जतन करणे, नाल्यांची नियमित स्वच्छता, डोंगर उतारांवरील वैज्ञानिक उपाययोजना, भूस्खलनप्रवण भागांचे मॅपिंग, अत्याधुनिक पूरपूर्व सूचना प्रणाली आणि हवामान बदल लक्षात घेऊन पायाभूत सुविधांची उभारणी या बाबींना सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागेल, विकास हा केवळ रस्ते, पूल आणि इमारती उभारण्यात नसतो; तर संकटाच्या काळातही व्यवस्था सक्षमपणे उभी राहण्यात असतो. पाऊस हा निसर्गाचा कोप नसून त्याची अपरिहार्य प्रक्रिया आहे. संकट निर्माण होते ते मानवी निष्काळजीपणामुळे, अनियोजित विकासामुळे आणि पर्यावरणाकडे झालेल्या दुर्लक्षामुळे, निसर्गाशी संघर्ष करून नव्हे, तर त्याच्याशी सुसंवाद साधूनच शाश्वत विकासाचा मार्ग सापडू शकतो. प्रत्येक पावसाळ्यानंतर त्याच चुका पुन्हा करण्याऐवजी त्या चुका दुरुस्त करण्याची सामूहिक इच्छाशक्ती निर्माण झाली, तरच महाराष्ट्राला दरवर्षीच्या या जलसंकटातून मुक्ती मिळू शकेल. अन्यथा निसर्गाचा हा इशारा भविष्यात अधिक गंभीर संकटांची चाहूल ठरू शकतो.

# सावधान : बोगस ब्यूटी क्रीम वापराल तर किडनी गमवाल!

## सोशल मीडियावरील रील्स पाहून होतोय तरुण–तरुणींकडून क्रीमचा वापर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा :**
**रजनीकांत पाटील**

अमळनेर : बाजारात सध्या झटपट गोरेपणा आणि इन्स्टंट ग्लोचा दावा करणाऱ्या अनेक संशयास्पद ब्यूटी क्रीमची सर्रास विक्री होत आहे. सोशल मीडियावरील रील्स पाहून तरुण–तरुणी या क्रीमच्या जाळ्यात ओढले जात आहेत. मात्र, स्वस्त मिळणाऱ्या आणि प्रामुख्याने पाकिस्तान, इंडोनेशियासारख्या देशांतून तस्करी करून आणलेल्या या क्रीममध्ये तब्बल वीस हजार पट अधिक पारा आणि घातक रसायने आढळली आहेत. हे विष केवळ त्वचा खराब करत नसून, थेट किडनी निकामी करत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.

### झटपट रिझल्टचा मोह

'फक्त ७ दिवसांत गोरे व्हा', 'डागविरहित त्वचा मिळवा' अशा भडक जाहिराती करून ग्राहकांना भुरळ घातली जाते. कोणत्याही ब्रेडचे नाव नसलेल्या किंवा स्थानिक पातळीवर पॅक केलेल्या या क्रीम ब्यूटिपार्लर, कॉस्मेटिक दुकाने आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर सहज उपलब्ध आहेत. झटपट रिझल्टच्या मोहात पडून हजारो नागरिक स्वतःच्या आरोग्याशी खेळत आहेत.

### क्रीम खरेदी करण्यापूर्वी काय पाहाल?

घटकांच्या यादीत क्रीमच्या पाकिटावर मर्क्युरी (पारा), मर्क्युरिक, कॅलोमेल, मर्क्युरस क्लोराईड, हायड्रोक्विनोन किंवा स्टिरॉइडस असे लिहिलेले आढळल्यास ती क्रीम अजिबात खरेदी करू नका. उत्पादनावर अन्न व औषध प्रशासनाचा परवाना क्रमांक आणि मंजुरी आहे का, याची खात्री करा.

### पाकिस्तान, इंडोनेशिया आदी देशांतून तस्करी

यातील बहुतांश क्रीम पाकिस्तान, इंडोनेशिया आणि इतर आशियाई देशांतून बेकायदेशीरपणे बाजारात आणल्या जातात. अत्यंत कमी किमतीत उपलब्ध होत असल्याने या क्रीम राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचल्या आहेत. या क्रीमच्या डब्यांवर उत्पादकाचा योग्य पत्ता, घटक किंवा परवाना क्रमांक लिहिलेला नसतो.



### अशा क्रीममध्ये पाऱ्याचे हजारो पट अधिक प्रमाण

प्रयोगशाळेत केलेल्या चाचण्यांमध्ये या बोगस क्रीममध्ये आरोग्यासाठी अत्यंत घातक असलेल्या 'पाऱ्याचे' प्रमाण तब्बल वीस हजार पट अधिक आढळले आहे. पारा त्वचेतील मेलेनीन तयार होण्याची प्रक्रिया तात्पुरती थांबवतो. ज्यामुळे माणूस गोरा दिसू लागतो. पण हा गोरेपणा नसून त्वचेचा आजार असतो.

### त्वचाच नाही तर किडनीवरही गंभीर परिणाम

रक्तात मिसळलेला पारा जेव्हा शरीराबाहेर टाकण्यासाठी किडनीकडे जातो, तेव्हा तो किडनीच्या फिल्टरिंग सिस्टीमचे गंभीर नुकसान करतो. क्रीमच्या सततच्या वापरामुळे शरीरातील प्रोटीन लघवीवाटे बाहेर पडू लागते आणि हळूहळू दोन्ही किडन्या कायमच्या निकामी होतात. क्रीम बंद करताच चेहरा काळा पडणे, त्वचा पातळ होऊन रक्तवाहिन्या दिसणे असा थोका असतो.

### ही लक्षणे दिसल्यास सावध व्हा

जर तुम्ही कोणतीही फेअरनेस क्रीम वापरत असाल आणि चेहऱ्यावर लालसरपणा येणे, आग होणे किंवा त्वचा अतिशय संवेदनशील होणे, चेहऱ्यावरील केस अचानक वाढणे, लघवीला फेस येणे किंवा लघवीचे प्रमाण कमी–जास्त होणे, पाय, घोटे आणि डोळ्यांच्या खाली सतत सूज येणे, अशक्तपणा, थकवा आणि भूक न लागणे आदी बदल दिसत असतील, तर त्वरित ती क्रीम बंद करा.

### पारा त्वचेतून शरीरात अन् थेट रक्तात

जेव्हा ही क्रीम चेहऱ्याला लावली जाते तेव्हा त्वचा हा पारा शोषून घेते. त्वचेच्या छिद्रांमधून हा पारा थेट शरीराच्या रक्तवाहिन्यांमध्ये आणि रक्तात प्रवेश करतो. रक्तात मिसळलेला हा घातक धातू हळूहळू शरीराच्या अंतर्गत महत्त्वाच्या अवयवांमध्ये जमा होऊ लागतो आणि ते अवयव आतून पोखरतो.

### रील्सवर व्हायरल, क्रीमवर उड्या

सोशल मीडियावरील रील्स आणि 'बीफोर–आफ्टर'चे खोटे व्हिडिओ दाखवून या क्रीमचे प्रमोशन केले जाते. कॉलेज तरुण–तरुणी आणि महिला या रील्सला बळी पडून कोणतीही शहानिशा न करता या क्रीमवर उड्या घेत आहेत

> "अवैध आणि तस्करी करून आणलेल्या अशा संशयास्पद सौंदर्य प्रसाधनांवर आमची कडक नजर आहे. नागरिकांनीही जागरूक राहून अशा बोगस क्रीमची माहिती 'एफडीए'कडे नोंदवावी आणि केवळ नोंदणीकृत फार्मासिस्टकडूनच क्रीम खरेदी कराव्यात. जाहिरातींना बळी पडू नये. उत्पादनाची तारीख, एक्सपायरी डेट, कोट याची तपासणी करावी. संशयास्पद उत्पादनाबाबत माहिती कळवावी.
> – **प्रशांत अस्वार,** सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, जळगाव.



अमळनेर : येथील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मनोज भाऊराव (मनोजबापू) पाटील यांच्या मातोश्री स्व. गं.भा. सुधाताई पाटील यांचे नुकतेच वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या निवासस्थानी जाऊन सांत्वन करताना माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्यासह विविध राजकीय, सामाजिक व सहकार क्षेत्रातील मान्यवर.

# काँग्रेसचे मनोजबापू पाटील कुटुंबीयांचे माजी मंत्री बाळासाहेब थोरातांकडून सांत्वन

## स्व. दाजीबा पाटील यांच्या आठवणींना उजाळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मनोज भाऊराव (मनोजबापू) पाटील यांच्या मातोश्री स्वर्गीय गं.भा. सुधाताई भाऊराव पाटील यांचे दि. २७ जून २०२६ रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या निवासस्थानी माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आमदार सुधीर तांबे यांच्यासह विविध राजकीय, सामाजिक व सहकार क्षेत्रातील मान्यवरांनी भेट देऊन पाटील कुटुंबीयांचे सांत्वन केले तसेच दिवंगतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी विधान परिषदेचे माजी उपसभापती स्व. दाजीबा पर्वत पाटील यांच्या कार्याचा गौरवपूर्ण स्मरण करत त्यांच्या सार्वजनिक जीवनातील योगदान, सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य आणि राजकीय कारकिर्दीतील अनेक आठवणींना उजाळा दिला. यावेळी सांगण्यात आले की, १९८६ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेचे उपसभापती तसेच महाराष्ट्र इंटकचे अध्यक्ष म्हणून स्व. दाजीबा पाटील यांनी भारताच्या वस्त्रोद्योगाचे प्रतिनिधित्व करत जपान, रशिया आणि जर्मनीचा दौरा केला होता. तत्कालीन मुख्यमंत्री स्व. वसंतदादा पाटील यांच्या मंत्रिमंडळात त्यांनी महत्त्वाची जबाबदारी सांभाळली होती. तसेच माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी आपल्या पिताश्री सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात आणि स्व. दाजीबा पाटील यांच्या सहकार व सार्वजनिक जीवनातील जिव्हाळ्याच्या संबंधांच्या आठवणींनाही उजाळा दिला.

यावेळी माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, मनोजबापू पाटील, काँग्रेसच्या महिला जिल्हाध्यक्षा सौ. सुलोचनाताई वाघ, शेतकी संघाचे चेअरमन संभाजी लोटन पाटील, नगरसेवक राजू दादा फाफोरेकर, जितेंद्र ठाकूर, हेमंत पवार, शत्रुघ्न पाटील, महेश पाटील, विश्वनाथ ठाकरे, भागवत सूर्यवंशी, जुबेर पठाण, तुषार संदानशिव, पी. वाय. पाटील, रऊफ पठाण, शिवाजी पाटील, सौ. गौरी शिंगणे, सुधीर वाघ, प्रताप पाटील तसेच आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी पाटील कुटुंबीयांचे सांत्वन करत त्यांच्या दुःखात सहभागी असल्याची भावना व्यक्त केली आणि दिवंगत आत्म्यास भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

# रोटरी क्लबतर्फे वन महोत्सवात 'एक पेड माँ के नाम' अभियान

## पर्यावरणासह वृक्षसंवर्धन आणि हरित अमळनेर घडविण्याचा उद्देश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील रोटरी क्लब, अमळनेर नगरपरिषद, महिला हाऊसिंग ट्रस्ट, पर्यावरण सखी व सामाजिक वनीकरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दि. ७ जुलै रोजी वन महोत्सवांतर्गत 'एक पेड माँ के नाम' अभियान राबविण्यात आले. रो. अजयभाऊ केले यांच्या घरासमोरील खुल्या जागेत हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत पर्यावरण व वृक्षसंवर्धन आणि हरित अमळनेर घडविण्याच्या उद्देशातून हा कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपाल श्रीमती सुनीता धनगर, वनरक्षक श्रीमती अलका पाटील व वनरक्षक जगदीश ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. रो. अजय केले यांच्या पत्नी सौ. विनीताताई केले यांच्या वाढदिवसानिमित्त पर्यावरणपूरक पद्धतीने वृक्षारोपण करून वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. शिबी वशिष्ठ यांनी आपल्या सुप्रसिद्ध 'भाग्यश्री' या शेळ्यांच्या लेंड्यांपासून तयार केलेले सेंद्रिय खत वृक्षवाढीसाठी भेट दिले. हे खत वृक्ष टवटवीत राहून त्यांची वाढ जलद व्हावी, यासाठी अतिशय उपयुक्त ठरणारे आहे.

रोटरी क्लबचे अध्यक्ष रो. महेश पाटील आणि सचिव रो. प्रशांत निकम यांनी सांगितले, की वन महोत्सवाच्या माध्यमातून 'एक पेड माँ के नाम' हा संदेश घराघरांत पोहोचविणे आवश्यक आहे. प्रोजेक्ट चेअरमन रो. अजय केले व रो. आशिष चौधरी यांनी प्रत्येक नागरिकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करावे, असे आवाहन केले.

या उपक्रमात रोटरी क्लबचे सदस्य विवेक देशमुख, अजय रोडगे, कीर्तिकुमार कोठारी, दिनेश रेझा, प्रतीक जैन यांच्यासह अनेक पर्यावरणप्रेमींनी सहभाग नोंदविला.




अमळनेर : येथील रोटरी क्लब, अमळनेर नगरपरिषद, महिला हाऊसिंग ट्रस्ट, पर्यावरण सखी व सामाजिक वनीकरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दि. ७ जुलै रोजी वन महोत्सवांतर्गत 'एक पेड माँ के नाम' अभियान राबविण्यात आले. याप्रसंगी वृक्षारोपण करताना वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपाल श्रीमती सुनीताताई धनगर, वनरक्षक श्रीमती अलकाताई पाटील व वनरक्षक जगदीश ठाकरे, सौ. विनीताताई केले आदी.

# जात, उत्पन्न व अधिवास दाखले आता शाळेतच मिळणार

## शालेय प्रवेशासाठी पालकांची धावपळ संपणार; सर्व जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीला शालेय प्रवेशासाठी जात, उत्पन्न, अधिवास प्रमाणपत्र किंवा इतर महत्त्वाच्या दाखल्यांसाठी विद्यार्थी व पालकांना सरकारी कार्यालये किंवा आपले सरकार सेवा केंद्रात हेलपाटे माराचे लागतात. मात्र, आता पालकांची ही वणवण थांबणार आहे. शाळेतच विशेष शिबिरांचे आयोजन करून विद्यार्थ्यांना आवश्यक दाखले उपलब्ध करून देण्याचे निर्देश सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.




शालेय प्रवेशासाठी जन्म प्रमाणपत्र, मागील शाळेचा हस्तांतरण दाखला (टीसी), आधार कार्ड (विद्यार्थी आणि पालक), रहिवासी पुरावा, पासपोर्ट आकाराचे फोटो आणि लागू असल्यास जात किंवा उत्पन्न प्रमाणपत्र या मुख्य कागदपत्रांची आवश्यकता असते. ही कागदपत्रे वेळेत न मिळाल्यास विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेस विलंब होतो तसेच शैक्षणिक नुकसान देखील होते. त्यामुळे आता ही दाखले वेळेत मिळण्याची सुविधा शाळांमध्येच केली जाणार आहे.

'आपले सरकार' सेवा केंद्राचे प्रतिनिधी थेट शाळांमध्ये येऊन दाखल्यांसाठी आवश्यक अर्ज व कागदपत्रांची प्रक्रिया पूर्ण करणार आहेत. यासाठी राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना स्थानिक प्रशासन, शाळा प्रशासन आणि शिक्षण विभागाच्या समन्वयाने शाळांमध्ये शिबिरांचे आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे दाखल्यांसाठी सरकारी कार्यालये आणि महा ई सेवा केंद्रांच्या चकरा मारण्याची वेळ येणार नाही. तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान व विलंब टळण्यास मदत होणार आहे.

### पैसे वाचणार आणि एंजटगिरीला चाप

सेतू केंद्र किंवा महा ई सेवा केंद्रामधून आधार कार्ड, रहिवाशी दाखला, उत्पन्नाचा दाखला ही कागदपत्र काढावी लागतात. शिवाय तेथे एजंटशिवाय कामे जलद होत नाहीत. एजंट मंडळी पालकांकडून जादा पैसे उकळतात, अशी पालकांसह विद्यार्थ्यांची तक्रार आहे. मात्र, आता शाळेतच दाखले देण्याची सुविधा उपलब्ध होणार असल्याने एजंटगिरीला चाप बसण्याबरोबरच विद्यार्थी आणि पालकांचे पैसही वाचणार आहेत.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com




# रोज ३ तास ट्रॅफिकमध्ये अडकायचा! आज वडापाव विकून कमावतो लाखो रुपये

## मराठी तरुणाने कसा उभारला व्यवसाय?

सक्सेस स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रोज ३ तास ट्रॅफिकमध्ये अडकून शोधली लाखोंची कमाई करणारी भन्नाट बिझनेस आयडिया. आज 'ट्रॅफिक वडापाव'च्या माध्यमातून हा मराठी तरुण महिन्याला लाखो रुपये कमावत असून अनेकांसाठी प्रेरणास्थान ठरला आहे.

सध्या सोशल मीडियावर उद्योगपती हर्ष गोयंका यांनी अलीकडेच शेअर केलेला एक व्हिडिओ चर्चेचा विषय ठरत आहे. याचे कारण आहे एका मराठी तरुणाची बिझनेस आयडिया आणि त्याचा प्रवास. सोशल मीडियावरील या व्हिडिओत ठाण्यातील गौरव लोंढे यांची प्रेरणादायी उद्योजकीय वाटचाल दाखविण्यात आली आहे. एका साध्या नोकरीतून सुरुवात करत त्यांनी मुंबईतील वाहतूक कोंडीची समस्या ओळखली आणि त्यातूनच स्वतःचा यशस्वी व्यवसाय उभा केला.

### पिझ्झा डिलिव्हरी बॉय

गौरव यांनी २००९ मध्ये अंधेरी येथे पिझ्झा डिलिव्हरी बॉय म्हणून काम करण्यास सुरुवात केली. दररोज काम संपल्यानंतर त्यांना ठाण्यातील आपल्या घरी परत येण्यासाठी सुमारे तीन तासांचा प्रवास करावा लागत असे. अवघे २४ किलोमीटर अंतर असतानाही प्रचंड ट्रॅफिकमुळे वेळ वाया जात असे.

### ट्रॅफिक ठरली बिझनेस आयडिया

रोज असाच ३ तास ट्रॅफिक मध्ये प्रवास करताना आणि भुकेले असताना त्यांना एक आयडिया सुचली. याचे कारण होते एक ट्रॅफिक सिग्नलवरील शेंगदाणा विक्रेता. एकदा सिग्नलवरून जाणाऱ्या शेंगदाणे विक्रेत्याकडून शेंगदाणे खरेदी केल्यानंतर त्यांच्या मनात विचार आला, की ट्रॅफिकमध्ये अडकलेल्या लोकांना जर जागेवर गरमागरम खायला मिळाले तर? आणि तेही त्यांच्या आवडीचे? याच विचारातून त्यांना एक नवा व्यवसाय सुरू करण्याची कल्पना मिळाली.

### द ट्रॅफिक वडापाव

२०१९ मध्ये गौरव यांनी नोकरीचा राजीनामा देत 'द ट्रॅफिक वडापाव' ही संकल्पना सुरू केली. त्यांच्या या व्यवसायासाठी त्यांना आईने आपल्याकडील पैसे दिले. त्यानंतर त्यांचा व्यवसाय सुरू झाला. सुरुवातीलाच ट्रॅफिकमध्ये वडापाव घेणे लोकांना आवडले नाही त्यामुळे कोणीही खरेदी करण्यास तयार नव्हते.

### पॅक वडापाव

लोक वडापाव घेत नाही म्हणून गौरव यांनी ग्राहकांसाठी वडापाव व्यवस्थित पॅक करून देण्यास सुरूवात केली. त्यासोबत पाण्याची बाटली आणि टिश्यू पेपरही दिला आणि सुरूवातीचे ५० वडापाव मोफत वाटले. त्यानंतर लोकांना ही संकल्पना आवडली आणि लोकांनी वडापाव खरेदी करण्यास सुरूवात केली. काही दिवसांतच लोकांचा विश्वास बसू लागला आणि ग्राहक स्वतः फोन करून ऑर्डर देऊ लागले. गौरव यांनी हा संपूर्ण पॅक फक्त २० रुपयांत विकण्यास सुरूवात केली.

### ट्रॅफिक सिग्नलवर दिसू लागली टीम

काळानुसार त्यांच्या व्यवसायाची लोकप्रियता वाढली. केसरी रंगाच्या टी-शर्टमधील त्यांची टीम सायंकाळी ५ ते रात्री १० या वेळेत ट्रॅफिक सिग्नलवर वडापाव विकू लागली. ऑफिसमधून घरी जाणाऱ्या अनेकांसाठी हा एक सोयीस्कर पर्याय ठरला.

### महिन्याला लाखोंची कमाई

२०२१ पर्यंत गौरव यांच्या टीममध्ये आठ कर्मचारी होते. ते दररोज जवळपास ८०० वडापाव विकत होते. या व्यवसायातून त्यांना महिन्याला सुमारे २ लाख रुपयांचे उत्पन्न मिळू लागले. एका साध्या डिलिव्हरी बॉयपासून यशस्वी फूड उद्योजक बनण्यापर्यंतचा गौरव यांचा प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. ज्या ट्रॅफिकची लोक रोज तक्रार करत होते, त्याच समस्येत त्यांनी व्यवसायाची संधी शोधली आणि स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले.




# खेती-किसानी करने वालों की किडनी क्यों हो रही खराब?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तमिलनाडु में किसानों पर लैंसेट की एक रिपोर्ट ने चौंकाने वाला खुलासा किया है। लैंसेट ने बताया है कि तमिलनाडु के ५ प्रतिशत से ज्यादा किसान क्रॉनिक किडनी रोग से पीड़ित हैं। डराने वाली बात है कि इनमें ज्यादातर किसानों को पहले ऐसी कोई मेडिकल कंडीशन नहीं थी जिससे उन्हें किडनी डैमेज का रिस्क होता।

तमिलनाडु से एक बड़ा स्वास्थ्य संकट उभरकर आया है। जिसमें समूचे देश की चिंता बढ़ा दी है। ब्रिटेन की मेडिकल पत्रिका 'द लैंसेट 'ने खुलासा किया है कि तमिलनाडु में किसानों की एक बड़ी संख्या किडनी की बीमारी से जूझ रही है।

पत्रिकाने अपने अध्ययन में यह भी बताया कि राज्य के ५.३१ प्रतिशत से ज्यादा किसान क्रोनिक किडनी डिजीज की गंभीर बीमारी से पीड़ित हैं जिनमें से लगभग आधे मामले सीकेडीयू (अज्ञात कारणों से होने वाला क्रॉनिक किडनी रोग) से जुड़े हैं। यानी सामान्य तौर पर डायबिटीज या हाई ब्लड प्रेशर की वजह से अक्सर लोगों को किडनी रोग हो जाता है, लेकिन इनमें ऐसा नहीं देखा गया, जो चिंताजनक है। क्यों किसानों को हो रही किडनी की बीमारी

'लैंसेट' का कहना है कि ना ही डायबिटीज और ना ही ब्लड प्रेशर इसका कारण हैं। बल्कि तमिलनाडु के किसानों में तेज गर्मी में ज्यादा देर रहने और डिहाइड्रेशन की वजह से गुर्दे की बीमारी का खतरा बढ़ रहा है। तेज गर्मी में ज्यादा देर रहने से शरीर पर तनाव पड़ता है और टीम ने इसी तनाव और किडनी डिसीस के बीच के कनेक्शन का जिक्र किया है।

'लैंसेट रीजनल हेल्थ - साउथ ईस्ट एशिया' में प्रकाशित यह शोध ३,३५० लोगों पर किया गया और इसमें राज्य में पड़ने वाली गर्मी के प्रभावों का भी अध्ययन किया गया। 'लैंसेट' का राज्य की स्वास्थ्य समस्याओं पर आधारित यह पहला अध्ययन था। यह अध्ययन अगस्त और दिसंबर २०२३ के बीच किया गया। अज्ञात कारणों से होने वाले क्रोनिक किडनी रोग को समझने के लिए राज्य के सभी पांच कृषि-जलवायु क्षेत्रों उत्तर-पूर्व, उत्तर-पश्चिम, पश्चिमी, कावेरी डेल्टा और दक्षिणी क्षेत्रों के किसानों का इस रिसर्च में शामिल किया गया था। सैंपलिंग मेथड के जरिए शोधकर्ताओं ने १२५ गांवों के ३,३५० किसानों का एनालिसिस किया और उनके कामकाज, स्वास्थ्य और पर्यावरण के जोखिम से जुड़े आंकड़े भी इकट्ठा किए। गर्मी और किडनी डैमेज कैसे जुड़ा है? इस अध्ययन में शामिल शोधकर्ताओं ने मौसम की वजह से किडनी के फंक्शन्स में होने वाला जबरदस्त बदलाव देखा। अगस्त के दौरान जो तमिलनाडु के सबसे गर्म महीनों में से एक था. इसमें शामिल १७.४% लोगों की Estimated glomerular filtration rate ६० मि.ली./मिनट/१.७३ वर्ग मीटर से कम थी। ईजीएफआर एक ब्लड टेस्ट है जो यह बताता है कि आपकी किडनी आपके खून से वेस्ट मटीरियल (अपशिष्ट पदार्थ) को कितनी अच्छी तरह छान रही है। हैरानी की बात रही कि दिसंबर में जब टेस्ट दोबारा किया गया तो ज्यादातर लोगों में गुर्दे का काम सामान्य हो गया था। यानी गर्मी में उनके गुर्दे सर्दी के मुकाबले बहुत अच्छी तरह काम नहीं कर रहे थे।



स्टडी में मिले चौंकाने वाले नतीजे तमिलनाडु स्थित मद्रास मेडिकल कॉलेज में नेफ्रोलॉजी संस्थान में सीनियर एसिस्टेंट प्रोफेसर और इस स्टडी के को-ऑथर आर. शक्तिराजन कहते हैं, 'ये एक्यूट किडनी डैमेज के बिना लक्षणों और सब क्लीनिकल वाले मामले थे।' सब क्लीनिकल का मतलब ऐसी कंडीशन जिसमें किडनी डैमेज को यूरीन या किसी और टेस्ट के जरिए पता लगाया नहीं जा सकता है और इसके लिए खास टेस्ट किए जाते हैं। उन्होंने आगे कहा, 'लैंसेट की स्टडी में लोगों के सभी टेस्ट एक ही लैब में किए गए थे इसलिए यह बिना किसी गलती के बजाय शरीर पर पड़ रहे तनाव और किडनी रोग में कनेक्शन को हाईलाइट करती हैं।'

# पाण्याची एक्सपायरी डेट माहिती आहे का?

## काही लोक फक्त एक दिवस जुने झालेले पाणी फेकून देतात... तर काही लोक आठवडाभर साठवलेले पाणीही सहजपणे पितात...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



हजारो वर्षे जमिनीखाली साठून राहिलेले पाणी आपण सर्वात शुद्ध आणि सुरक्षित मानतो. मग पाण्याची खरी एक्सपायरी डेट नेमकी काय आहे? या प्रश्नाचे उत्तर समजले, तर पाण्याकडे पाहण्याचा तुमचा संपूर्ण दृष्टिकोन बदलू शकतो. आपण अनेकदा आपल्या सोयीसाठी आणि विचारसरणीनुसार पाण्याला 'एक्सपायरी डेट' ठरवतो. प्रत्यक्षात मात्र याला कोणताही वैज्ञानिक आधार नाही. आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या काही गोष्टी पाहा-

शहरांमध्ये जेथे दररोज नळाचे पाणी मिळते तेथे अनेक लोककालचे पाणी 'शिळे' झाले, असे समजून टाकून देतात.

**(त्यांच्या मते पाण्याची एक्सपायरी डेट फक्त १ दिवस.)**

आठवड्यातून एकदा पाणी मिळणाऱ्या भागात तेच पाणी २ ते ८ दिवस साठवून कोणतीही शंका न बाळगता वापरले जाते.

**(त्यांच्या मते, एक्सपायरी डेट २ ते ८ दिवस.)**

लग्नसमारंभ आणि सामाजिक कार्यक्रमांमध्ये नवीन बाटली उघडताच आधी उघडलेली बाटली दुर्लक्षित होते किंवा फेकून दिली जाते.

**(त्यांच्या मते, एक्सपायरी डेट फक्त काही मिनिटे किंवा तास.)**

### पण सत्य वेगळे आहे...

वाळवंटात प्रवासादरम्यान पुढचा पाण्याचा स्रोत मिळेपर्यंत प्रत्येक थेंब तितकाच मौल्यवान आणि 'ताजा' असतो.

**(एक्सपायरी डेट : पुढचा पाण्याचा स्रोत मिळेपर्यंत.)**

निसर्गात धरणे आणि जलाशयांमध्ये साठवलेले पाणी पुढील पावसाळ्यापर्यंत वापरले जाते. दुष्काळाच्या काळात हेच पाणी दोन-तीन वर्षेही पुरते.

**(एक्सपायरी डेट : अनेक वर्षे.)**

बोअरवेल आणि भूजलसाठ्यात ५० ते ५०० फूट खोलीतून काढले जाणारे पाणी शेकडो किंवा हजारो वर्षांपासून जमिनीखाली साठलेले असू शकते. तरीही आपण त्याला सर्वात सुरक्षित आणि आरोग्यदायी पाणी मानतो.

**(एक्सपायरी डेट : शेकडो किंवा हजारो वर्षेकदाचित कधीच नाही.)**

विचार करण्यासारखी गोष्ट

प्रत्यक्षात, पाण्याला स्वतःची कोणतीही एक्सपायरी डेट नसते. त्याची उपयुक्तता त्याच्या स्वच्छतेवर, साठवणुकीच्या पद्धतीवर आणि उपलब्धतेवर अवलंबून असतेफक्त वेळेवर नाही. जेव्हा पाणी मुबलक असते, तेव्हा आपण त्याला 'शिळे' म्हणतो. पण जेव्हा टंचाई निर्माण होते, तेव्हा तेच पाणी अमृतासारखे वाटते. म्हणूनच पाण्याचा जबाबदारीने वापर करूया आणि प्रत्येक थेंब जपूया. अन्यथा पृथ्वीवरील पाणी संपण्यापूर्वीच आपल्या निष्काळजीपणामुळे आपल्याला तहान सहन करावी लागू शकते.

### एक नम्र विनंती

हा फक्त एक संदेश नाहीतर आपल्या भविष्यासाठी पाणी वाचविण्याचे आवाहन आहे. कृपया हा संदेश आपल्या कुटुंबीय, मित्र आणि समाजात शेअर करा, जेणेकरून पाण्याचे महत्त्व सर्वांपर्यंत पोहोचेल.

**पाणी म्हणजे जीवन**

**पाणी असेल, तरच आपले उद्याचे भविष्य असेल. निरोगी राहा. सुरक्षित राहा. पाणी वाचवा.**

# 'आराध्या खमण हाऊस' व 'आमरस भंडार' आजपासून अमळनेरकरांच्या सेवेत

अमळनेरमधील खाद्यप्रेमी अर्थात खवय्यांच्या जिभेवर अधिराज्य गाजवणाऱ्या पदार्थांद्वारे आनंदी मेजवानी देण्याच्या उद्देशातून शहरातील धुळे रोडवरील श्री स्वामी समर्थ केंद्रासमोर आजपासून अर्थात गुरुवार, ९ जुलै २०२६ पासून 'आराध्या खमण हाऊस' व 'आराध्या आमरस भंडार' यांचा भव्यदिव्य शुभारंभ होत आहे. या भंडारचे नावही अर्थपूर्णच आहे ते म्हणजे 'आराध्या'. 'आराध्या' म्हणजे 'पूजनीय' या अर्थाने या भंडाराची व्याप्ती लक्षात घेता नक्कीच खमण आणि आमरस खवय्यांच्या जिभेवर तरळल्याविना राहणार नाही, याची जणू खात्रीच संचालक हर्षद पाटील यांनी समस्त अमळनेरकरांना दिली आहे.

नाश्तासाठी खमंग आणि पारिवारीक पाहुणचारासाठी नक्कीच आमरसाला सर्वच जण प्राधान्य देतात, ही नामी खुबी ओळखूनच बहुधा पाटील परिवाराने हे भंडार सुरू करण्याचा ध्यास घेतलेला आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. खरे म्हणजे खमण म्हटले की काहीशी आंबट-गोड चव जेव्हा जिभेवर तरळते तेव्हा खऱ्या अर्थाने नाश्ता केल्याची अनुभूती येते, असे म्हटले जाते. त्यामुळे खमण हा पदार्थ जरी गुजरातवासीयांच्या परिचयाचा असला तरी 'आराध्या'च्या माध्यमातून ग्राहकांच्या जिभेवर आपली खास खासीयत म्हणून अमळनेरकरांच्या पचनी पडले, हा विश्वास पाटील परिवाराला आहे.






आराध्या खमण हाऊसमध्ये युनिक फॉर्म्युलेशनद्वारे तयार केलेले अस्सल गुजराती खमण, उच्च दर्जाची (हाय क्वालिटी) व स्वच्छ, हायजेनिक पद्धतीने तयार केलेली उत्पादने ग्राहकांना उपलब्ध करून दिले जाणार आहेत. तसेच ग्राहकांच्या सोयीसाठी प्रशस्त व आरामदायी बैठक व्यवस्थाही तयार केलेली आहे. अशा प्रकारची सुविधा अमळनेरमध्ये प्रथमच उपलब्ध होत असल्याचा दावाही पाटील परिवाराकडून करण्यात आला आहे.

अमळनेकरांनी 'आराध्या आमरस भंडार'वर सार्थ विश्वास दाखवत अल्पावधीतच ते नावारूपाला आणले. त्यातूनच उत्कृष्ट सेवेचे बळ कायम राखत आता खमण हाऊस सुरू केले जात आहे. ते सुद्धा नक्कीच ग्राहकाभिमुख असेल, असा विश्वास यानिमित्ताने हर्षद पाटील यांनी व्यक्त केला आहे. अनेक लग्न समारंभ, सामाजिक व कौटुंबिक कार्यक्रमांमध्ये दर्जेदार आणि चविष्ट आमरस पुरवठा करून या प्रतिष्ठानाने शहरात व शहराबाहेर वेगळी ओळख निर्माण केली आहे. विशेष म्हणजे ग्रामीण भागातील ग्राहकांपर्यंतही दर्जेदार रेडिमेड आमरसाची चव पोहोचविण्याचे कार्य ते यशस्वीपणे करीत असल्याने या सेवेला मोठा प्रतिसाद मिळत आहे. या भंडारचे विशेष वैशिष्ट्य असे, की झीरो कंप्लेंट्स, कुठल्याही प्रकारची तक्रार नाही व कोणालाही आमरसामुळे शारीरिक बाधा झाल्याचे ऐकायला आणि चर्चेतही आलेले नाही. अशा पद्धतीचा फिडबॅक मिळणे, हीच 'आराध्या'ची उत्कृष्ट सेवेची पावती म्हणावी लागेल, असे हर्षद पाटील आणि परिवारातील सदस्य हे विश्वासाने सांगतात. त्यामुळे आता 'आराध्या खमण हाऊस'च्या भव्या शुभारंभ सोहळ्यास आपण सर्व अमळनेकरांसह तालुकावासी व हितचिंतकांनी धुळे रोडवरील श्री स्वामी समर्थ केंद्रासमोर सकाळी १० वाजता मोठ्या संख्येने उपस्थिती देऊन आमच्यावरील सार्थ विश्वास आणखी वृद्धिंगत करावा, असे आवाहन करत जाहीर निमंत्रण दिले आहे. मग नक्की आवर्जून याच..!

**(शब्दांकन : शरद कुलकर्णी)**


शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरूम

सीमा हॅण्डलूम हाऊस पारोला रोड, धुळे




# आध्यात्मिक परीपक्वता म्हणजे काय?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

१) आध्यात्मिक परीपक्वता म्हणजे  जेव्हा तुम्ही दुसऱ्यांना बदलण्याचा प्रयत्न करणे थांबवता, ... आणि त्याऐवजी स्वतःला बदलण्यावर लक्ष केंद्रित करता.

२) आध्यात्मिक परीपक्वता म्हणजे जेव्हा तुम्ही लोकांना जसे आहे तसे स्वीकारता.

३) आध्यात्मिक परिपक्वता म्हणजे जेव्हा तुम्ही हे समजून घेता की प्रत्येक जण आपापल्या जागी आपापल्या दृष्टिकोनातून बरोबरच असतो.

४) आध्यात्मिक परिपक्वता म्हणजे जेव्हा तुम्ही 'सोडून देणे' शिकता.

५) आध्यात्मिक परिपक्वता म्हणजे जेव्हा तुम्ही नातेसंबंधांतून 'अपेक्षा' करणे थांबवता आणि फक्त 'देण्यासाठीच देणे' सुरू करता.

६) आध्यात्मिक परिपक्वता म्हणजे जेव्हा तुम्ही हे समजून घेता की तुम्ही जे काही करता, ते फक्त स्वतःच्या मनःशांतीसाठी करता.

७) आध्यात्मिक परिपक्वता म्हणजे जेव्हा तुम्ही जगाला, 'मी किती बुद्धीमान आहे' हे सिद्ध करणे थांबवता.

८) आध्यात्मिक परिपक्वता म्हणजे जेव्हा तुम्ही आपल्या कृतीला दुसऱ्यांच्या कडून मान्यता मिळवत नाही.

९) आध्यात्मिक परिपक्वता म्हणजे जेव्हा तुम्ही दुसऱ्यांशी तुलना करणे थांबवता.

१०) आध्यात्मिक परिपक्वता म्हणजे जेव्हा तुम्ही स्वतःसोबत शांतपणे रहाता.

११) आध्यात्मिक परिपक्वता म्हणजे जेव्हा तुम्ही 'गरज असणे' आणि 'हवे असणे' यातील फरक ओळखता आणि सर्व 'हव्या' असलेल्या गोष्टींचा त्याग करता आणि सर्वांत शेवटी आणि सगळ्यात अर्थपूर्ण.

१२) आध्यात्मिक परिपक्वता म्हणजे जेव्हा तुम्ही 'आनंद' भौतिक गोष्टींशी जोडणे थांबवता.



# मनुष्यजन्म हा योगायोग नसून अनेक जन्मांच्या पुण्यकर्मांचे फळ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**


मनुष्यजन्म हा योगायोग नसून अनेक जन्मांच्या पुण्यकर्मांचे फळ आहे. त्यातही श्री दत्त महाराजांची भक्ती लाभणे, त्यांच्या सेवेत राहणे किंवा त्यांच्या कृपेचा लाभ होणे हे अत्यंत दुर्लभ भाग्य आहे.

या संसाराच्या मोहात अडकून आपण जीवनाचा अमूल्य वेळ वाया घालवतो. पण आपल्या उद्धाराचा सर्वांत सोपा मार्ग म्हणजे श्री दत्त नामस्मरण. अजामिळाचा उद्धार एका हाकेत झाला, परंतु आपली पापे आणि वासना दूर करण्यासाठी सतत दत्तनामाचा आधार घ्यावा लागतो.

चला, आज एक छोटासा संकल्प करूयादिवसातून एकदा तरी मनापासून 'श्रीगुरुदेव दत्त' म्हणूया. हाच आपल्या जीवनातील सर्वांत मोठा आध्यात्मिक लाभ ठरू शकतो.

हे दत्त महाराज, आमच्या या संकल्पाला बळ द्या. तुमचे स्मरण आमच्या ओठांवर आणि तुमचे चरण आमच्या हृदयात सदैव राहू दे. तुमच्या भक्तीत आमचे मन कायम रममाण राहो.

**॥ श्रीगुरुदेव दत्त ॥**



# कुंडलीत गुरू खराब आहे कसा ओळखावा?

## गुरुवारी करा हे उपाय; ग्रहदोष दूर होऊन भगवान विष्णू व गुरूची होईल कृपा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ज्योतिषशास्त्रानुसार गुरू ग्रह हा अत्यंत शुभ मानला जातो. पण जर एखाद्या व्यक्तीच्या कुंडलीत गुरूची स्थिती खराब असेल तर त्याला आयुष्यात अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. जसे की, लग्नाला उशीर होणे, कामात यश न मिळणे किंवा केलेल्या कामाचे श्रेय दुसऱ्याला मिळणे अशा समस्या उद्‌भवू शकतात. म्हणूनच गुरुवारी काही खास उपाय केल्यास कुंडलीतील गुरू ग्रहाचे अशुभ परिणाम कमी करता येतात.



### गुरू ग्रह खराब आहे कसा ओळखावा?

कुंडलीतील गुरू ग्रह खराब असल्याची काही लक्षणे आहेत. जर गुरू ग्रह कमजोर असेल तर व्यक्तीला मानसिक चिंता, आर्थिक नुकसान आणि आरोग्याच्या समस्यांना तोंड द्यावे लागते. तसेच, समाजात मान-सन्मान कमी होतो. चांगले काम करूनही त्याचे श्रेय दुसऱ्याला मिळते आणि आपल्याला आपल्या मेहनतीचे फळ मिळत नाही.

गुरूला मजबूत करण्याचे प्रभावी उपाय

१) तुमच्या कुंडलीत जर गुरू ग्रहाची स्थिती खराब असेल, तर तुम्ही खालील उपाय करू शकता. प्रत्येक गुरुवारी भिजवलेली चण्याची डाळ गुळासोबत मिसळून गायीला खायला द्या. हा उपाय केल्याने गुरू ग्रहाची कृपा प्राप्त होते.

२) दुसरा उपाय म्हणजे गुरुवारी केळीच्या झाडाची मुळी पिवळ्या कपड्यात बांधून उजव्या हातात धारण करा. पण हे करण्यापूर्वी त्या मुळीची पूर्ण विधी-विधानाने पूजा करणे आवश्यक आहे.

३) जर गुरू ग्रह कुंडलीत खराब असेल तर अंघोळीच्या पाण्यात थोडीशी केसर किंवा हळद टाका आणि मग स्नान करा. यासोबतच रोज आपल्या कपाळावर हळदीचा किंवा केशराचा टिळा लावा. यामुळे गुरू ग्रहाचा प्रभाव सकारात्मक होतो.

४) गुरुवारी दत्त मंदिर किंवा स्वामींच्या मठात जाऊन साबूत मूगडाळ दान करा. तसेच १२ वर्षांखालील कोणत्याही लहान मुलीचे पाय स्पर्श करून तिचा आशीर्वाद घ्या. लहान मुलींचा आशीर्वाद घेणे हे गुरू ग्रहासाठी खूप शुभ मानले जाते.

५) चमेलीची ९ किंवा १२ फुले घेऊन ती वाहत्या पाण्यात सोडून देऊ शकता. तसेच पिवळ्या कनेरच्या फुलांनी बृहस्पती किंवा विष्णू देवतेच्या प्रतिमेची पूजा करा. हे उपाय केल्याने गुरू ग्रहाची अशुभता कमी होते आणि जीवनात सुख-समृद्धी येते. हे सर्व उपाय सोपे आहेत आणि ते नियमितपणे केल्यास नक्कीच फायदा होतो असे सांगितले जाते.

# गुरुवारी तुळशीचे 'हे' उपाय केल्यास घरात नांदणार सुख-समृद्धी..!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भगवान विष्णूंची गुरुवारी पूजा करण्याबरोबरच या दिवशी तुळशीच्या रोपाची पूजा करणे देखील अतिशय महत्त्वाचे मानले जाते. गुरुवारी तुळशीचे काही उपाय केल्याने घरामध्ये सुख-समृद्धीचे आगमन होते, अशी मान्यता आहे.

हिंदू धर्मामध्ये गुरुवारचा दिवस हा भगवान विष्णू आणि देवगुरू बृहस्पती यांना समर्पित असल्याचे म्हटले जाते. यावेळी त्याची विधीवत पूजा करणे देखील महत्त्वाचे मानले जाते. शास्त्रानुसार गुरुवारी तुळशीच्या रोपाची पूजा करण्याला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. गुरुवारी तुळशीच्या संबंधित काही उपाय केल्याने भगवान विष्णू आणि देवी लक्ष्मी प्रसन्न होतात, अशी मान्यता आहे. त्यासोबतच घरातील प्रत्येक सदस्यांवर त्यांचा आशीर्वाद राहतो असे म्हटले जाते. गुरुवारच्या दिवशी तुळशीचे कोणते उपाय केल्याने फायदे होतात ते



जाणून घ्या

### जीवनामध्ये प्रगती करण्यासाठी उपाय

सकाळी लवकर उठून भगवान विष्णूंची विधीवत पूजा करावी. त्यानंतर एका भांड्यामध्ये पाणी घेऊन त्यामध्ये हळद आणि गंगाजल मिसळून ते तुळशीच्या रोपाला अर्पण करावे. दर गुरुवारी हा उपाय केल्याने तुमच्या जीवनात येणाऱ्या सर्व समस्या दूर होतील आणि तुमची जीवनामध्ये प्रगती होईल. गुरुवारी तुळशीचा हा उपाय केल्याने भगवान विष्णू आणि देवी लक्ष्मी प्रसन्न होतात.

### धन वाढविण्यासाठी करा हे उपाय

सकाळी आणि सायंकाळी भगवान विष्णूंची पूजा करावी. सायंकाळी भगवान विष्णूंची पूजा केल्यानंतर तुळशीजवळ तुपाचा दिवा लावावा. दिवा लावून झाल्यानंतर 'ओम श्रीं ह्रीं क्लीम श्रीं लक्ष्मी नारायणाय नमः' या मंत्रांचा शक्य झाल्यास १०८ वेळा जप करावा. हा उपाय केल्याने भगवान विष्णू आणि देवी लक्ष्मी प्रसन्न होतात. तसेच घरामध्ये सुरू असलेले आर्थिक संकट देखील दूर होते.

### आशीर्वाद मिळविण्यासाठी करा हे उपाय

सकाळी पूजा झाल्यानंतर तुळशीच्या रोपाला पाणी अर्पण करावे. तसेच 'ॐ नमो भगवते वासुदेवाय नमः' या मंत्रांचा १०८ वेळा जप करावा. हा उपाय केल्याने भगवान विष्णू आणि देवी लक्ष्मी प्रसन्न होतात. त्यासोबतच जीवनातील नकारात्मकता दूर होऊन सकारात्मक ऊर्जा घरामध्ये प्रवेश करते.

### व्यवसाय आणि करिअरमधील अडचणी दूर करण्यासाठी उपाय

तुम्हाला तुमच्या करिअर किंवा व्यवसायात वारंवार समस्या येत असल्यास गुरुवारी तुळशीचा हा उपाय करू शकता. सायंकाळी तुळशीच्या रोपाजवळ दिवा लावून त्या रोपाजवळ ५ किंवा ७ पिवळ्या कढई ठेवा. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी पूजा झाल्यानंतर त्या उचलाव्या आणि लाल किंवा पिवळ्या कपडात बांधून पैसे ठेवण्याच्या ठिकाणी ठेवा. त्यामुळे तुमचे करिअर आणि व्यवसायामध्ये येणारे अडथळे दूर होतील.

# दत्तभक्तीचा महामंत्र : 'दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा'

## हा मंत्र मानवी जीवनाचा उद्धार करणारा, आध्यात्मिक महामार्ग कसा? जाणून घ्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि संपूर्ण भारतात दत्त संप्रदायाला एक मोठी आणि प्राचीन परंपरा लाभली आहे. अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त, श्री स्वामी समर्थ, किंवा अलख निरंजन अशा अनेक जयघोषांनी दत्तभक्तांचे हृदय प्रफुल्लित होते. परंतु या सर्व जयघोषांमध्ये आणि मंत्रांमध्ये 'दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा' या मंत्राचे स्थान अत्यंत अढळ, वंदनीय आणि चमत्कारी मानले गेले आहे. हा केवळ चौदा अक्षरांचा एक नामजप किंवा मंत्र नाही, तर तो मानवी जीवनाचा उद्धार करणारा एक महान आध्यात्मिक महामार्ग आहे.

दत्त संप्रदायाचे आद्य अवतार मानले गेलेले श्रीपाद श्रीवल्लभ (पीठापूर) यांच्या रूपाशी आणि दत्तप्रभूंशी जोडलेला हा मंत्र वरवर पाहता अत्यंत साधा आणि सुलभ वाटतो. सामान्य भाविक हा मंत्र देवाचे नाव म्हणून आवडीने, श्रद्धेने म्हणतो. परंतु जेव्हा आपण या मंत्राच्या अंतरंगात प्रवेश करतो तेव्हा लक्षात येते, की यात संपूर्ण वेदान्त, उपनिषदांचे सार आणि मानवी मनाचा मोक्षापर्यंतचा प्रवास अत्यंत सुंदर रीतीने गुंफला आहे. प्रस्तुत लेखात आपण या मंत्राच्या चारही भागांचा (पहिला दिगंबरा, दुसरा दिगंबरा, श्रीपादवल्लभ आणि चौथा दिगंबरा) अत्यंत विस्तारपूर्वक आणि तात्विक अभ्यास करणार आहोत.

मंत्राची सुरूवात 'दिगंबरा' या शब्दाने होते. 'दिगंबर' या शब्दाची जर आपण फोड केली, तर 'दिक् + अंबर' असा संधी होतो. 'दिक्' म्हणजे दिशा आणि 'अंबर' म्हणजे वस्त्र. ज्याने दिशांनाच आपले वस्त्र मानले आहे, जो नग्न आहे, ज्याला कशाचेही आवरण नाही, तो दिगंबर.

पहिल्या दिगंबरा या शब्दाने त्या शुद्ध अहम्‌ला हाक मारली आहे. तो आत्मा म्हणजे शुद्ध अहम्. तो साक्षी आहे. निर्विकार आहे. अनंदरूप आहे.

सामान्यतः माणूस या जगात जगत असताना स्वतःची ओळख कशी करून देतो? 'मी अमुक अमुक आहे, मी डॉक्टर आहे, मी इंजिनिअर आहे, मी गरीब आहे, मी श्रीमंत आहे, मी काळा आहे, मी गोरा आहे.' ही झाली शरीराची आणि उपाधींची ओळख. पण अध्यात्म सांगते, की हे शरीर म्हणजे तुम्ही नाही. शरीर तर आज आहे आणि उद्या मातीत मिसळणार आहे. मग 'खरा मी' कोण?

पहिला 'दिगंबरा' शब्द आपल्याला याच प्रश्नाचे उत्तर शोधायला लावतो. तो आपल्याला सांगतो, की आपल्या या नश्वर शरीराच्या आत एक अविनाशी तत्त्व राहते, त्याला आपण 'आत्मा' म्हणतो. हा आत्मा कसा आहे?

**तो साक्षी आहे :** तो तुमच्या आयुष्यातील चांगल्या-वाईट घटना फक्त पाहतो, त्यात अडकत नाही.

**तो निर्विकार आहे :** शरीराला रोग होतो, मनाला दुःख होते, पण आत्म्याला कोणताही विकार शिवत नाही.

**तो अनंदरूप आहे :** त्याला कशाचीही गरज नाही, तो स्वतःमध्येच पूर्ण आणि आनंदी आहे.


पहिला 'दिगंबरा' शब्द म्हणताना साधकाने स्वतःच्या शरीराचा, नावाचा आणि रूपाचा विसर पाडून, आपल्या आत असलेल्या त्या 'शुद्ध अहम्' (मी आहे ही जाणीव) म्हणजेच आत्म्याला हाक मारायची असते. हा स्वतःच्या खऱ्या रूपाचा शोध घेण्याचा पहिला टप्पा आहे.

जेव्हा साधकाला पहिल्या शब्दाने स्वतःच्या आत्म्याची जाणीव होते तेव्हा त्याच्या मनात दुसरा प्रश्न निर्माण होतो 'माझा शोध तर लागला, पण माझ्या सभोवताली जे एवढे मोठे विश्व दिसत आहे, ते काय आहे? हे जग कुठून आले?' या दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर आपल्याला मंत्रातील दुसऱ्या 'दिगंबरा' या शब्दात मिळते.

'दुसऱ्या दिगंबरा या शब्दाने परब्रह्माचे अनुसंधान केले आहे. आपल्याभोवती जे सर्वही विश्व दिसते आहे ते केवळ भासणारे आहे. वस्तुतः ते सर्व एकमेव भगवंतच आहे...'

भारतीय तत्त्वज्ञानात विशेषतः आदि शंकराचार्यांच्या अद्वैत वेदांतात 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' असे म्हटले आहे. याचा अर्थ असा नाही की हे जग अस्तित्वातच नाही. तर याचा अर्थ असा आहे, की हे जग जसे दिसते तसे कायम टिकणारे नाही, ते बदलणारे आहे. जसे सोन्यापासून अनेक प्रकारचे दागिने (अंगठी, गळपट्टी, बांगड्या) बनविले जातात. नावे वेगवेगळी असली तरी मूळ तत्त्व 'सोने' हे एकच असते. तसेच या जगात कोट्यवधी जीव आहेत, डोंगर, नद्या, सूर्य, चंद्र आहेत; पण या सर्वांमागे, या सर्वांना चालवणारी जी एकच मूळ महाशक्ती आहे, तिला 'परब्रह्म' म्हणतात.

दुसऱ्या 'दिगंबरा' शब्दाचा उच्चार करताना साधक आपल्या डोळ्यांना दिसणाऱ्या या अथांग विश्वाकडे पाहतो आणि समजून घेतो, की 'हे जे काही मला दिसत आहे, ते सर्व त्या एकाच परमेश्वराचे रूप आहे. झाडात तोच आहे, प्राण्यात तोच आहे, माझ्या शत्रूत आणि मित्रातही तोच आहे.' या जाणिवेमुळे साधकाच्या मनातील भेदभावाची भावना नष्ट होते. संपूर्ण विश्वाला परमेश्वर मानून त्या विराट परब्रह्माला मारलेली साद म्हणजे दुसरा 'दिगंबरा' शब्द होय.



पहिली दोन चरणे (आत्मतत्त्व आणि परब्रह्मतत्त्व) अत्यंत गूढ आणि बुद्धीच्या पलीकडची आहेत. सर्वसामान्य माणसाला 'निराकार आत्मा' किंवा 'अथांग परब्रह्म' यावर लक्ष केंद्रित करणे खूप कठीण जाते. मानवी मनाला एकाग्र होण्यासाठी एका आधाराची, एका सुंदर रूपाची गरज असते. ती गरज मंत्रातील तिसरा शब्द पूर्ण करतो, तो म्हणजे 'श्रीपादवल्लभ'.

'श्रीपादवल्लभ भगवंताचे सगुण साकार रूप आहेत. ते भगवंताचेच अवतार आहेत. त्यांना संबोधन केले आहे.'

दत्त संप्रदायात कलियुगातील पहिला अवतार म्हणजे 'श्रीपाद श्रीवल्लभ' होय. त्यांचा जन्म आंध्र प्रदेशातील पीठापूर येथे झाला होता. ते साक्षात दत्तप्रभूंचे सगुण रूप होते.

'श्री' म्हणजे लक्ष्मी, ऐश्वर्य, शोभा आणि शक्ती. 'पाद' म्हणजे चरण किंवा पाऊल. 'वल्लभ' म्हणजे स्वामी किंवा पती. ज्यांच्या चरणांमध्ये संपूर्ण विश्वाचे ऐश्वर्य, शांतता आणि ज्ञान वास करते, ते म्हणजे श्रीपादवल्लभ. जेव्हा आपण 'श्रीपादवल्लभ' हा शब्द उच्चारतो तेव्हा आपल्या डोळ्यांसमोर दत्तगुरूंचे ते अत्यंत तेजस्वी, हातात जपमाळ, कमंडलू धारण केलेले, पाठीमागे कामधेनू आणि चार वेद (चार कुत्रे) असलेले सगुण रूप उभे राहते.

हा शब्द भक्तीचा मार्ग दाखवतो. ज्ञानमार्गाने जे परब्रह्म समजायला कठीण होते, तेच परब्रह्म श्रीपादवल्लभांच्या रूपाने आपल्यासाठी सोपे आणि सुलभ होते. 'हे देवा, तुम्ही कितीही मोठे, निराकार असलात, तरी माझ्यासाठी तुम्ही माझे गुरू, माझे माता-पिता श्रीपादवल्लभ आहात,' हा शरणागतीचा भाव या तिसऱ्या शब्दांत आहे.

आता साधकाने स्वतःला ओळखले (पहिला दिगंबरा), विश्वातील देवाला ओळखले (दुसरा दिगंबरा), आणि देवाच्या सगुण रूपावर प्रेम केले (श्रीपादवल्लभ). आता शेवटचा टप्पा येतो तो म्हणजे 'प्रार्थनेचा' आणि 'एकतेचा'. म्हणूनच शेवटचा शब्द पुन्हा येतो  'दिगंबरा'.

'माझ्यातील सर्व विकार नाहीसे करा. मला लवकर आपल्या जवळ न्या. आपले स्वरुप मला प्राप्त होऊ दया... अहं ब्रम्हास्मि हा अनुभव मला येऊ दया.'

हा चौथा 'दिगंबरा' शब्द म्हणजे जीवात्म्याने शिवात्म्याकडे केलेली आर्त हाक आहे. यात साधक दत्तगुरूंना म्हणतो :

**१) विकारांचा नाश :** 'हे गुरुदेवा, माझ्या मनात अजूनही काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर हे विकार आहेत. जोपर्यंत हे विकार आहेत तोपर्यंत मी मुक्त होऊ शकत नाही. कृपया माझे हे विकार नष्ट करा.'

**२) भ्रमाचा निरसण :** 'मला रोज सकाळी उठल्यावर वाटते की मी केवळ हा देह आहे, मला भूक लागते, मी मरेन, मी जन्मेन. हा माझा 'देहभ्रम' आहे. हा भ्रम तुमच्या कृपेने दूर करा.'

**३) अहं ब्रह्मास्मि (मीच ब्रह्म आहे) :** हा उपनिषदांमधील महामंत्र आहे. साधक शेवटी अशी प्रार्थना करतो, की 'हे श्रीपादवल्लभ, तुमच्यात आणि माझ्यात कोणताही फरक राहू नये. जसा पाण्याचा थेंब समुद्रात पडल्यावर तो थेंब राहत नाही तर स्वतः समुद्र बनून जातो, तसा मी तुमच्यात मिसळून जावा. मला 'मीच ब्रह्म आहे' (अहं ब्रह्मास्मि) हा प्रत्यक्ष अनुभव येऊ द्या.'

चौथ्या 'दिगंबरा' शब्दाने साधक स्वतःसाठी तीच 'दिगंबर अवस्था' मागतो, जी दत्तगुरूंची आहे. दिगंबर अवस्था म्हणजे कपडे नसणे नव्हे, तर सर्व प्रकारच्या मोहांचे, आशा-आकांक्षांचे आणि अज्ञानाचे आवरण फाडून पूर्णपणे मुक्त होणे होय.

हा मंत्र म्हणताना साधक आधी स्वतःच्या आत डोकावतो, मग विश्वाकडे पाहतो, मग गुरूंचे ध्यान करतो आणि शेवटी गुरूंमध्येच विलीन होऊन जातो. यापेक्षा सोपी आणि सुंदर आध्यात्मिक प्रक्रिया दुसरी कोणती असू शकते?

अनेकदा लोकांना वाटते, की असे आध्यात्मिक विचार फक्त संन्याशांसाठी किंवा वयोवृद्धांसाठी असतात. पण हा गैरसमज आहे. 'दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा' या मंत्राचा दैनंदिन जीवनात वापर केल्यास माणसाला अनेक मानसिक आणि शारीरिक लाभ होतात.

**मानसिक शांतता आणि तणावमुक्ती :** आजच्या धावपळीच्या युगात माणसाला प्रचंड तणाव आहे. जेव्हा आपण या मंत्राचा संथ गतीने जप करतो तेव्हा आपल्या मेंदूतील लहरी शांत होतात. 'मी म्हणजे केवळ हे शरीर नाही,' हा विचार मनात आल्यावर संकटांची भीती कमी होते.

**अहंकाराचा नाश :** या मंत्रात जगाला परब्रह्म मानले आहे. जेव्हा आपण समोरच्या व्यक्तीमध्येही देवाचे रूप पाहतो, तेव्हा आपल्यातील अहंकार, राग आणि द्वेष गळून पडतात. यामुळे कौटुंबिक आणि सामाजिक संबंध सुधारतात.

**एकाग्रता वाढणे :** विद्यार्थ्यांसाठी आणि काम करणाऱ्या लोकांसाठी हा जप एकाग्रता वाढविण्यास मदत करतो. श्रीपादवल्लभ हे ज्ञानाचे देव आहेत, त्यांच्या स्मरणाने बुद्धी सात्त्विक आणि तीव्र होते.

**सकारात्मक ऊर्जा :** या मंत्राच्या उच्चारणाने निर्माण होणारी कंपने वास्तूतील आणि शरीरातील नकारात्मक ऊर्जा दूर करतात आणि सकारात्मकतेचा संचार करतात.

'दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा' हा केवळ नामस्मरण करण्याचा मंत्र नाही, तर ते एक 'जीवन जगण्याचे शास्त्र' आहे. तो आपल्याला संकुचित वृत्तीकडून विशालतेकडे आणि अज्ञानाकडून प्रकाशाकडे घेऊन जातो.

**॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपदवल्लभ दिगंबरा ॥**

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)